दै. पुण्यनगरी दि. 03.11.2019

# राष्ट्रीय एकात्मता कार्यक्रम संपन्न

**नांदेड/ प्रतिनिधी**

नांदेड शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्या अंतर्गत राष्ट्रीय एकात्मता आणि एकात्मता दौड कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानिमित्त झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक अनिरुद्ध काकडे हे होते. पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मुख्य वक्ते म्हणून गोविंद मुंडकर व प्रमुख अतिथी म्हणून गंगाधर फुगारे उपस्थित होते.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले. प्रारंभी पोलीस उपनिरीक्षक नलवडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून राष्ट्रीय एकात्मतेची गरज प्रतिपादीत केली. गोविंद मुंडकर यांनी 'राष्ट्रीय एकात्मता काळाची गरज' याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात केलेल्या विशेष कार्याची उपस्थितांना आठवण



करून दिली. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील पहिले शहीद गोविंदराव पानसरे यांच्या जीवनावर संक्षिप्त प्रकाश टाकला. मगर यांनी 'सायबर क्राईम आणि युवा पिढी' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. यावेळी स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे युवक पोलीस, अधिकारी, कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. पुण्यनगरी 3/11/19.